# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १८ जुलै, २०१२
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

**अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये-**

**(मंगळवार, दिनांक १० जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ व २) -**

**(१) श्री.विक्रम काळे, वि.प.स.**

"वाढीव/अतिरिक्त तुकड्यांना गेल्या ७/८ वर्षात शासनाने मान्यता न दिल्याबाबत" या विषयावरील श्री.रामनाथ मोते, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.नागो गाणार, डॉ.रणजित पाटील, श्री.वसंतराव खोटरे, प्रा.दिलीपराव सोनावणे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री. दिपकराव साळुंखे, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. तसेच श्री.संजय केळकर, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक २६३८५ ला दिनांक १९ मार्च, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील."

**(२) श्री.विक्रम काळे, वि.प.स.**

"राज्यातील महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही" या विषयावरील श्री.सुभाष चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजन तेली, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.सुरेश नवले, डॉ.दिपक सावंत, श्री.परशुराम उपरकर, श्री.रामनाथ मोते, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो गाणार, श्री.किरण पावसकर, श्री.रमेश शेंडगे, श्री.हेमंत टकले, श्रीमती उषाताई दराडे, श्री.विक्रम काळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.एम.एम.शेख, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स. तसेच श्री.संजय केळकर, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक २६०३३ ला दिनांक १९ मार्च, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(बुधवार, दिनांक ११ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक ३ व ४) -**

**(३) श्री. चंद्रकांत पाटील व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्य शासन दूध प्रकल्पांना कोट्यवधीचे अनुदान देत असतानाही सहकारी व खाजगी

दूध प्रकल्पातील दूधात घातक रसायनांचे मिश्रण करीत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०१० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, शेतकऱ्यांकडून कमी दराने दूध विकत घेऊन रसायने मिसळून राज्यात विशेषत: बारामती, मुंबई, पुणे, औरंगाबाद, अहमदनगर, सोलापूर, कोल्हापूर, महाराष्ट्र कर्नाटक सीमा येथे मोठ्या प्रमाणात दूध भेसळ होणे, वनस्पती तेल, प्राण्यांची चरबी, हायड्रोजन पेरॉक्साईड, स्टार्च, ग्लुकोज, माल्टोज, फुक्टोज, मीठ, गव्हाचे पीठ, तांदळाचे पीठ वापरुन हे दूध तयार करण्यात येत असणे, दूध सम्राटांना राजकीय पाठींबा असणे, राज्याच्या अन्न व औषधे प्रशासनाकडून कारवाईबाबत दिरंगाई होत असणे, कारवाई होत नसल्याने भेसळयुक्त दूधाची विक्री सुरु असणे, दूध भेसळ करणाऱ्या संबंधित कंपनीच्या व्यवस्थापनावर तसेच अन्न व औषधे विभागाच्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.रामनाथ मोते व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात सहशिक्षण प्रणाली असल्याने मुले-मुली एकाच शाळेत शिकणे, शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने प्रत्येक शाळेमध्ये वापरण्यायोग्य स्वतंत्र स्वच्छता गृहे मिळण्याचा विद्यार्थ्यांचा हक्क असणे, शाळांमध्ये स्वतंत्र स्वच्छता गृहे नसल्याने व असणारी स्वच्छता गृहे वापरण्यायोग्य नसल्याने विद्यार्थांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होणे, अनेक विद्यार्थी यामुळे आजारी पडणे, मा.सर्वोच्च न्यायालयाने दखल घेऊन राज्य शासनास निर्देश देणे, अद्यापही कार्यवाही न होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

**(गुरूवार, दिनांक १२ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना)(क्रमांक ५ व ६) -**

(५) **श्री.जयवंतराव जाधव व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"नाशिक शहरातील जुन्या नाशिक भागातील घरे प्रामुख्याने भेंडे, दगडमातीची आणि मातीच्या ढिगाऱ्यांवर वसलेली असणे, या परिसरातील रस्ते अतिशय अरुंद असल्याने मुलभूत सुविधा, स्वच्छता व वाहतुकीचा प्रश्न निर्माण झालेला प्रश्न, गावठाण भागातील या सुविधा राबविण्याकरिता शासनाने महापालिकेकडून व्यापक विकास प्रस्ताव दर्शविणारी योजना तयार करुन शासनास सादर करण्याचे निर्देश देऊनही महापालिकेकडून कार्यवाही करण्यास विलंब होणे, मुंबईच्या धर्तीवर जुने नाशिक भागात गावठाण पुनर्विकास योजना

तात्काळ राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.रामनाथ मोते व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात शैक्षणिक वर्ष २०००-०१ पासून शिक्षण सेवक योजना लागू असून नियुक्तीनंतर ३ वर्षे मानधन व ३ वर्षे समाधानकारक सेवेनंतर नियमित वेतनश्रेणी देण्याची तरतूद असणे, आरक्षणाची पदे भरण्यासाठी अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षण सेवकांची नियुक्ती करण्याची सवलत लागू असणे, अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षकांना ३ वर्षात डी.एड. प्रशिक्षणाची सोय शासनाकडून उपलब्ध न होणे, ३ वर्षात डी.एड. न झालेल्या शिक्षकांना मानधनावरच वेतन देणे, ३ वर्षापेक्षा अधिक काळ मानधनावर ठेवणे अन्यायकारक असून मागासवर्गीयांचे शोषण करणारे असणे, ३ वर्षानंतर अप्रशिक्षित शिक्षण सेवकांना अप्रशिक्षित शिक्षकांना वेतनश्रेणी अनुज्ञेय असणे, अप्रशिक्षित शिक्षकांच्या वेतनश्रेणीची तरतूद नियमात असणे, डी.एड. प्रशिक्षित व शिक्षण सेवक कालावधीचा संबंध नसल्याने ३ वर्षानंतर वेतनश्रेणी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक १६ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक ७ व ८) -**

(७) **श्री.जयंत पाटील व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"केंद्र शासनाच्या अनुदानावर राज्यामध्ये शालेय पोषण आहार योजना राबविण्यात येणे, चालू शैक्षणिक वर्षात शालेय पोषण आहार योजने अंतर्गत राज्यातील ३५ जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सुमारे २५ हजार प्राथमिक शाळांना साहीत्याचे वाटप करण्याचे कंत्राट राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने औरंगाबाद येथील मे.गिरीजामाता जनहित सेवाभावी संस्था, नागपूर येथील इंटमेट प्रेस मेटल प्रायव्हेट लिमिटेड, वैद्य इंडस्ट्रीज व संकेत स्टील इंडस्ट्रीज यांना माहे फेब्रुवारी, २०१० व मार्च, २०१० या सुमारास साहित्य पुरवठा करण्याचे आदेश देऊन त्यांचे समवेत दर करार करुन सुमारे २० कोटी रुपयांची साहित्य खरेदी करणे, यामध्ये खुल्या बाजारात १८/- रुपयाला मिळणारा ग्लास २७/- रुपयाला, ४९ रुपयाला मिळणारे ताट ९५/- रुपयाला, ४८१ रुपयाला मिळणारी स्टील कोठी १,००८/- रुपयांना व २२४/- रुपयांना मिळणारी स्टील बादली ४८६/- रुपयांना याप्रमाणे खरेदी करुन शाळांना पुरवठा करणे व प्राथमिक शाळांच्या शिक्षकांना साहित्य न पहाताच वाटप करण्याचे आदेश देणे, या सर्व प्रकरणामध्ये झालेला भ्रष्टाचार कोटी रुपयांच्या वर असणे, सबब या गंभीर प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्रीमती शोभा फडणवीस व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात विशेषत: गडचिरोली जिल्ह्यातील ४६ हजार ८९३ हेक्टर जमीन सिंचनाचे प्रकल्प हे वन कायद्याच्या धोरणामुळे वंचित असणे, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नद्या असूनही जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सिंचनापासून प्रलंबित रहावे लागणे, मात्र १९८० च्या वन कायद्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी, ता.तुलतुली, धानोरा, ता.कारवाफा, मुलचेरा, ता.चेन्ना, गडचिरोली, ता.पोहार व कोरची ता.खोब्रागडी ह्या प्रकल्पाची कामे १९८३ पासून सुरु होवूनही अद्यापही कामे रखडली जाणे, त्यामुळे जिल्ह्यात सिंचनाची सोय असूनही अद्याप वनकायद्यामुळे सदर प्रकल्पाची कामे न होणे, परिणामी जिल्ह्यातील शेतकरी सिंचनापासून वंचित राहून पिक न घेवू शकणे, त्यामुळे सदर प्रकल्पाना वन कायद्यापासून मुक्त करण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक ९ व १०) -**

**(९) श्री.विक्रम काळे, वि.प.स.**

"ग्रामीण भागातील शाळांमध्ये संगणकाची माहिती देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक नेमण्यासाठी करावयाची कार्यवाही" या विषयावरील डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक २८७६४ ला दिनांक १६ एप्रिल, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(१०) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.**

"जातीचे प्रमाणपत्र प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणे देण्यापेक्षा एका कुटुंबाला एक प्रमाणपत्र देण्याबाबत" या विषयावरील डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांच्या दिनांक १९ एप्रिल, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या बावीसाव्या यादीतील प्रश्न क्रमांक २५००२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : शासकीय विधेयक :-**

**विधानसभेने समंत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व समंत करणे -**

सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक १५ - महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयक, २०१२.

**तीन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे :-**

**मा.मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम), (पहिली सुधारणा) नियम, २०१२ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमव्हीआर.०३१२/प्र.क्र.२२७/पुनर्बांधणी-१/परि-२, दिनांकित २५ जून, २०१२" सभागृहासमोर ठेवतील.

**चार : (अ) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**(ब) म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - असल्यास.**

**पाच : लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **सर्वश्री.विनोद तावडे,** चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबईत सर्व सामान्यांसाठी घरे बांधण्यासाठी मोठी जबाबदारी असलेल्या म्हाडाकडे घर बांधणीसाठी किरकोळ जमीन उरलेली असताना सन १९९९ ते २००२ या कालावधीत म्हाडाचे तब्बल ६७ भूखंड राजकीय नेते वा त्यांच्या सगेसोयऱ्यांच्या संस्थांना नाममात्र दरात वाटप केल्याचे नुकतेच उघडकीस येणे, या भूखंड वाटपामुळे "म्हाडा" ला सुमारे २० हेक्टर जागेवर पाणी सोडावे लागणे, या प्रकरणी २००४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने देखील सदर भूखंड वाटप चुकीचे असल्याचे मत व्यक्त केले असणे, सध्या म्हाडाकडे केवळ २०,००० स्क्वे.मिटर जागा उपलब्ध असणे, सर्व सामान्यांसाठी रास्त दरात घरे बांधण्याची उद्देश साध्य करण्यासाठी अतिरिक्त भूखंडाची आवश्यकता असल्याने म्हाडा बाजार भावाने खाजगी जमीनी विकत घेत असल्याचे उघडकीस येणे, म्हाडाच्या सदनिकांचा दर वाढून म्हाडाची स्थापना करण्यामागचा उद्देश पराभूत होणे, परिणामी सर्वसामान्य मुंबईकरांमध्ये शासनाविषयी तीव्र संताप व चीड पसरणे, या भूखंड वाटपाची न्यायालयीन चौकशी करण्याची आवश्कता, या सर्व भूखंडांचे वाटप रद्द करुन ते ताब्यात घेऊन त्याठिकाणी सामान्य माणसांसाठी घरे बांधण्याची नितांत आवश्यकता, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.चरणसिंग सप्रा, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबई पूर्व द्रुतगती महामार्गवरील मुलुंड येथील मुलुंड-गोरेगांव लिंक रोडच्या

रुदीकरणाचे काम पूर्ण झालेले असणे, परंतू सदर रोडवरील नाहुर रेल्वे पुल हा अरुंद व जुना असल्यामुळे येथे वाहतुकीची नेहमी फार मोठा प्रमाणात निर्माण होत असलेली कोंडी, प्रवाशाचे होत असलेले आतोनात हाल, सदर रेल्वे पुलाचे रुंदीकरण आणि नुतनीकरण करण्यात यावे अशी जनतेची मागील ८ ते ९ वर्षापासूनची होत असलेली मागणी, यासंदर्भात लोकप्रतिनिधी सतत पाठपुरावा करणे, परंतू महानगर पालिका आणि रेल्वे विभागाचे याकडे जाणून बुजुन होत असलेले दुर्लक्ष, परिणामी परिसरातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. अनिल भोसले,** जयवंतराव जाधव, डॉ. निलम गोऱ्हे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जुहू (मुंबई) येथील ओकवूड हॉटेलमध्ये दिनांक २० मे, २०१२ रोजी टाकण्यात आलेल्या पोलीसांच्या धाडीत अमली पदार्थांचे सेवन केल्याबदल तसेच रेव्ह पार्टी आयोजित करुन त्यात सहभागी झाल्याबद्दल एकूण ९२ व्यक्तींना पकडण्यात येणे, त्यापैकी सुमारे ४४ व्यक्तींच्या रक्ताच्या नमून्यांमध्ये अमली पदार्थांचा अंश आढळून ४४ जणांचे अहवाल पॉझिटिव्ह आल्याची बाब उघडकीस येणे, अजुनही ५० टक्के व्यक्तींचे अहवाल येण्यास विलंब लागणे, या व्यक्तींमध्ये अनेक हिंदी व मराठी टिव्ही सिरियल कलाकार, फॅशन डिझायनर, उद्योगपती, बिल्डर यांच्या मुलांचा समावेश असणे, यापूर्वी पुणे शहरातील तीन विविध ठिकाणी रेव्ह पार्टीचे आयोजन करुन त्यामध्ये मोठ्या प्रमाणात आमली पदार्थांचे सेवन झाल्याचे त्यावेळी घातलेल्या छाप्यात सिध्द होऊनही संबंधीत अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या तसेच पुरवठादार व्यक्ती व संयोजकां विरोधात गुन्हा दाखल होऊनही अद्यापही एकाही व्यक्तीविरुध्द शिक्षेची कारवाई पूर्ण न होणे, तसेच मुंबई, पुणेसह, नागपूर या ठिकाणी रेव्ह पार्ट्यांचे करण्यात येत असलेले आयोजन, त्याकरिता इंटरनेट वरुन देण्यात येणारी निमंत्रणे या सर्वांवर त्वरीत पायबंद घालण्याची नितांत आवश्यकता, तसेच ज्या ४४ व्यक्तींचे अहवाल पॉझिटिव्ह आले आहेत त्यांना त्वरीत अटक करुन त्यांच्यावर कडक कारवाई करणेबाबत पोलीसांकडून होत असलेली अक्षम्य विलंब, यामुळे सर्वसामान्य नागरीकांच्या मनात निर्माण झालेली चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुण्यात गेल्या दोन वर्षात एक हजारांहून अधिक महिलांचा भाजून मृत्यु झाल्याची धक्कादायक माहिती नुकतीच उघडकीस येणे, यावरून महिलांच्या आरोग्यासह कौटूंबिक स्थितीबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण होणे, सन २०१० आणि २०११ या दोन वर्षात पुण्यासारख्या पुढारलेल्या आणि सांस्कृतिक शहरात १००५ महिलांचा मृत्यू झाल्याची नोंद असून मृत्यूचे कारण समजू शकले नाही, तरी कौटुंबिक कलहातून महिला रागाच्या भरात रॉकेल ओतून पेटवून घेतल्याच्या किंवा त्यांना पेटविल्याचे प्रकार घडल्याचा अंदाज व्यक्त होणे, सदरहू आकडेवारीवरुन पुण्यातील महिलांचे आयुष्य अत्यंत दाहक होत चालल्याने त्यावर नियंत्रण आणण्याकरिता कठोर उपाययोजना तसेच कडक कायदे करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(५) **श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"असोसिएटची सेट (Associate CET) ची परीक्षा माहे मे, २०११ मध्ये देऊन असोसिएटने त्यांच्या वेब साइटवर दिनांक ६ सप्टेंबर, २०११ रोजी जमनलाल गोयनका दंत महाविद्यालय, अकोला येथे तिसऱ्या राऊंड मध्ये यादी घोषीत करणे, दिनांक १२ सप्टेंबर, २०१२ पर्यंत दिलेल्या अंतीम तारखेच्या यादीत ५ विद्यार्थ्यांचा मुदतीत प्रवेश निश्चित होणे, उर्वरित ३४ विद्यार्थ्यांनी ३० सप्टेबर, २०११ पर्यंत सर्व अटी पुर्ण करुन प्रवेश घेणे, दंत महाविद्यालयाच्या प्रवेशावर बंदी असूनही या संस्थेने याचिका क्रमांक ३९८२/२०११ दाखल करुन प्रवेश बंदीवर स्टे ऑर्डर घेवुन प्रवेश प्रक्रिया पुर्ण करणे, विद्यार्थ्याचे शैक्षणीक वर्ष सुरु होऊ अभ्यासक्रम पुर्ण होणे, मे-जुन २०१२ मध्ये विद्यापिठाच्या परीक्षेला पात्र असून प्रविष्ठ होण्यासाठी परीक्षेचे प्रवेश पत्र विद्यापिठाने पाठविलेले नसणे, त्यामुळे ३९ विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणे, त्यांचे वर्ष वाया जाणे, त्यांचे आर्थिक नुकसान होणे, याबाबत मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १ जून, २०१२ रोजी याबाबतचे एक निवेदन ३९ विद्यार्थ्यांच्या सह्यानिशी अकोला येथे सादर करणे, तसेच आरोग्य मंत्री, कुलगुरु महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनाही विद्यार्थ्यांच्या सह्यानिशीचे निवेदन दिनांक २५ एप्रिल, २०१२ व त्या दरम्यान सादर करणे, परंतु अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही शासनाकडून न होणे याबाबत शासन विषयी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम व पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भुमिका व प्रतिक्रिया."

**सहा : विशेष उल्लेख सूचना - असल्यास -**

**सात : शासकीय विधेयक :-**

**विधानसभेने संमत केल्यास - विधेयक विचारात घेणे.**

सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक २४ - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१२.

**<u>दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर</u>**

## (दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत)

**आठ : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा -**

**डॉ. दिपक सावंत, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"राज्यातील स्त्री-भ्रृण हत्येच्या व एमटीपी किटच्या पार्श्वभूमिवर अनेक केमिस्ट डिस्ट्रिब्युटर्स वर धाडी पडणे, त्यामुळे केमिस्ट व ड्रगिस्ट यांनी संप पुकारणे, एफ.डी.ए. नी अनेक बीएएमएस, बीएचएमएस डॉक्टरांची प्रिस्क्रीपशन्स परत पाठवणे व औषध देण्यास नकार देणे, ब्लडप्रेशर डॉयबेटीसची औषधे फ्रेश प्रिस्क्रीप्शन शिवाय न देणे, असे काढलेले आदेश त्यामुळे ग्रामीण व शहरी आरोग्य व्यवस्था बाधित होणे, राज्यातील एमएमबीएस डॉक्टरांचे प्रमाण कमी असल्यामुळे इतर डॉक्टर ॲलोपेथिक औषधांची प्रॅक्टिस सुरु करित असणे, शेड्युल-के मध्ये ड्रग ॲड कॉस्मेटिक रुल मध्ये अंगणवाडी सेविकांना ॲलोपेथिक औषधे देण्याची मुभा असणे, राज्यात बीएएमएस डॉक्टरांना पीएचसी वर मेडीकल ऑफिसर म्हणून नेमणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**नऊ : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

**(मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला प्रस्ताव)-**

**डॉ. सुधीर तांबे,** सर्वश्री. हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, विजयसिंह मोहिते-पाटील, मोहन जोशी, अरुण गुजराथी, सुरेश नवले, दिपकराव साळुंखे, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती अलका देसाई, श्री.राजन तेली, **वि.प.स. यांचा प्रस्ताव -**

"रस्ते अपघातांचे दिवसेंदिवस वाढत असलेले चिंताजनक प्रमाण वाढती वाहतूक, अपुरे व अरुंद रस्ते, बेकायदेशीर वाहतूक, बेशिस्त, अप्रशिक्षित व बेजबाबदार वाहनचालक, अकार्यक्षम वाहतूक नियंत्रण व्यवस्था, यासारख्या प्रश्नांमुळे अपघातांमुळे मृत्यू पावणारांची संख्या आज हृदयरोग व अन्य कुठल्याही आजारांमुळे मृत्यु पावणाऱ्यांपेक्षा खूप अधिक आहे. वाहनांचा वाढलेला वेग, यामुळे अतिशय भीषण अपघात सतत होत असतात. परिणामी मृत्यू वा जीवघेण्या जखमा यांचे प्रमाण खूप अधिक असणे, या गंभीररित्या जखमींवर उपचार करण्यासाठी असलेल्या ट्रॉमा सेंटर्स व ॲम्ब्युलन्स व्यवस्था अपुरी व तोकडी असणे, या अपघातांमध्ये बळी पडणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी असणे, तरुण

व्यक्ती बळी पडल्यामुळे कुटुंब निराधार होऊन उध्वस्त होणे, या अपघातात बळी पडलेल्यांना "अपघात विमा" च्या सुविधा योग्यरितीने उपलब्ध नसणे, रस्ते अपघाताचा हा प्रश्न अतिशय महत्वाचा असल्याने यावर त्वरीत उपाययोजना करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश असलेली समिती नेमणे आवश्यक असून या सर्व समस्यांवर तोडगा काढण्यासाठी शासनाने करावयाची ठोस उपाययोजना याबाबत शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

दहा : **अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी)**

(१) **श्रीमती विद्या चव्हाण व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईतील गोरेगांव न्यु सिध्दार्थनगर येथील संक्रमण शिबीर इमारत क्र.३२ व ३३ मधील रहिवाशी हे मूळचे दक्षिण मुंबईतील रहिवाशी असून त्यांना संक्रमण शिबीरात तात्पुरत्या स्वरुपात २० ते २५ वर्षापुर्वी रहावयास जागा दिलेली आहे, शासनाने ते रहात असलेल्या ठिकाणाचा पुनर्विकास करून विनामुल्य घर देण्याची हमी देवूनही अद्याप मूळ राहत्या ठिकाणी घर दिलेले नाही. ते सध्या रहात असलेल्या संक्रमण शिबीरांच्या ठिकाणी मुलभूत सोयीसुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत, यामुळे त्यांचे पुनर्वसन मूळ राहत्या ठिकाणी करण्याची सातत्याने होत असलेल्या मागणीवर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **डॉ.सुधीर तांबे व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील वैद्यकीय व्यावसायिकाच्या अधिकृत व्यवसायासाठी बॉम्बे नर्सिंग होम ॲक्टच्या तरतूदीचे पालन न करणे, या तरतुदी अतिशय क्लिष्ट व अनावश्यक असणे, विशेषत: ग्रामीण भागात व दुर्गम भागात कार्यरत असणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांना या तरतूदींचे पालन करणे शक्य नसणे, त्यामुळे वैद्यकीय सेवा अधिक महागड्या होणे. यासाठी बॉम्बे नर्सिंग होम ॲक्टमध्ये सुधारणा व बदल करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**<br>
मुंबई,<br>
दिनांक : १७ जुलै, २०१२.

**डॉ.अनंत कळसे,**<br>
प्रधान सचिव,<br>
महाराष्ट्र विधानपरिषद.